औषध निर्माण अधिकारी या
संवर्गातील कर्मचारी खास बाब बदली

अहिल्यानगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था - ६/ 308 /२०२४
अहिल्यानगर दि.२४/०२/२०२५

**विषय** :-श्री.विटनोर नवनाथ रखमाजी,औषध निर्माण अधिकारी यांचे खासबाब अंतर्गत विनंती बदली बाबत.
**(प्रकरण १ मधील ४(४)मधील** प्राध्यान्य क्रमानुसार करण्यात आलेल्या विनंती बदल्या)
**संदर्भ** :- १. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासननिर्णय क्रमांक जिपब-०४१४/प्रक्र११२/आस्था-१४, दिनांक १५ मे २०१४
२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील पत्र क्र.जिपब-०२१५/(प्र क्र ५०/२०१५)/आस्था १४ दिनांक ११ मे २०१५
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील मंजुर टिपणी दि.२४/२/२०२५

**आदेश**

शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद अहमदनगर आरोग्य विभागच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या औषध निर्माण अधिकारी गट क संवर्गातील कर्मचा-यांच्या त्यांच्या नावापुढे रकाना क्र. ४ मध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांवर विनंती बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | सध्याचे कार्यरत ठिकाण प्रा.आ.केंद्र/ तालुका | विनंती बदलीने पदस्थापना दिलेले ठिकाण प्रा.आ.केंद्र/ तालुका | बदली प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. विटनोर नवनाथ रखमाजी | वाकडी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर | सोनई ,ता.नेवासा, जि.अहिल्यानगर | विनंती |

सबब संबधित अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी त्यांचेकडील कार्यभारा बाबत पर्यायी व्यवस्था करावी. विनंतीने बदली झालेल्या कर्मचा-यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

बदली झालेल्या कर्मचा-यांनी रजेवर न जाता बदलीने पदस्थापना केलेल्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे. बदली रद्द करण्यासाठी प्रयत्न करणे अगर दबाव आणने अगर नेमुन दिलेल्या तालुक्यात हजर न झाल्यास त्यांचे म.जि.प. जिल्हा सेवा वर्तणुक नियम १९६७ मधील ६(५) नुसार शिस्तभंग कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या wwwnagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा सांकेतांक क्र. 20250224100052 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 16:11:31
(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति** :- श्री. विटनोर नवनाथ रखमाजी,(औषध निर्माण अधिकारी)
**द्वारा व प्रत** :- वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र,**वाकडी**,ता.राहाता,जि. अहिल्यानगर, यांना कार्यवाही साठी
२/ उपरोक्त नमुद आपले कार्यालयातील कर्मचा-यांना बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी स्थानिक व्यवस्था करून तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
**प्रत** :- वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र,सोनई,ता.नेवासा जि.अ. नगर यांना कार्यवाहीसाठी
२/ उपरोक्त नमुद कर्मचा-यांना आपले कार्यालयात हजर करून घेणेत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
**प्रत** :- १. संबंधीत तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती,ता.राहाता व नेवासा, जि.अहिल्यानगर
२. संबंधीत गटविकास अधिकारी पंचायत समिती,ता.राहाता व नेवासा, जि.अहिल्यानगर

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर